REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# महाराष्ट्रातील सहकारी दुग्ध व्यवसायाच्या समस्या

**प्रा.डॉ. अनिल कांबळे**
**ल.भा.पा.महिला महाविदयालय,सोलापूर**

## प्रास्ताविक:



ग्रामीण भागात शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय खूपच उपयुक्त आहे.दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण भागातील महत्त्वाचा व्यवसाय आहे ज्या व्यक्तीजवळ शेतजमीन नाही असे लोकही दुग्ध व्यवसाय करू शकतात अशा अनेक लोकांना दुग्ध व्यवसाय हा वरदान ठरलेला आहेदुग्ध व्यवसायाचा उल्लेख शेतीला पूरक व्यवसाय म्हणून केला जातो

भारतासारख्या कृषिप्रधान देशात व मोठ्या प्रमाणात ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या लोकांना दुग्ध व्यवसायाने आर्थिक स्वातंत्र्य निर्माण दिले आहे ग्रामीण बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी दुग्ध व्यवसायाने मोठा वाटा उचलला आहे राज्यात फक्त सहकारी व शासकीय यंत्रणेमार्फत सुमारे५ लाख लीटर्स दुधाचे संकलन होत होते. महाराष्ट्रात सन २०१७ मध्ये एकूण दूध उत्पादक संस्थांची संख्या११,५९७ आणि सहकारी दूध संघ ७३ इतके होते. सन २०१७-१८ मध्ये एकूण दुधाचे उत्पादन१११.०२ लाख मेट्रिक टन इतके होते. तर सन २०२०-२१ च्या सुधारित अंदाजानुसार१३७०३.३२ लाख मेट्रिक टन इतके दुधाचे उत्पादन महाराष्ट्रात झाले होते

## संशोधनाची उद्दिष्टे :

- सहकारी दूध व्यवसायाच्याआर्थिक समस्या समजून घेणे

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहेत्यासाठी प्रकाशित ग्रंथ,पुस्तके,मासिके इत्यादीचा वापर करून संकलित माहितीच्या आधारे प्रस्तुत शोध निबंध तयार करण्यात आला आहे

## संशोधनाची गृहीतके:

- सहकारी दूध व्यवसायाच्या आर्थिक समस्या आहेत .

## सहकारी दूध व्यवसायाच्या समस्या

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर सहकारी दूध संस्थांचीवेगाने प्रगती झाली. गेल्या ६० वर्षांच्या कालावधीत सहकारी दुग्ध व्यवसायाच्या प्रगतीमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या त्या समस्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील

१. **कार्यक्षम दूध संस्थांचा अभाव**

गावपातळीवरील प्राथमिक दूध सस्था अर्थक्षम होण्यासाठी दररोज सरासरी ५०० लीटर दूध संस्थेकडे गोळा आले पाहिजे तरच ती प्राथमिक दूध संस्था अर्थक्षम होऊ शकते दूध गोळा करण्याची दैनंदिन क्षमता कमी करूनही संस्थेस तेवढे दूध गोळा होत नाही या संस्था अर्थक्षम झाल्या तर दुध उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या दुधाला वाजवी दर देता येतो.

२. **पुरेशा दूध संकलनाची समस्या:**

ग्रामीण भागात वाहतुकीच्या सोईचा अभाव असल्यामुळे ग्रामीण भागात दूध संकलन करणे अतिशय अवघड बाब आहे. पावसाळ्यात पावसामुळे रस्ते खराब होतात आणि उन्हाळ्यात वाहने वेळेवर पोहोचू शकली नाही तर - दूध खराब होते. त्यामुळे अर्थक्षम असणाऱ्या प्राथमिक सहकारी दूध उत्रादक संस्थांनादेखील तोटा सहन करावा लागतो

३. **पुरेशा शासकीय मदतीचा अभाव :**

महाराष्ट्र सरकार दुग्ध संस्थांच्या प्रगतीसाठी फारशी- मदत करीत नाही. सहकारी दुग्ध संस्थांचे दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी आणि राज्यातील संस्थांच्या दुर्बल घटकांचा विशेषतःसीमांत शेतकरी व भूमिहीन शेतमजूर त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सहकारी दुग्ध संस्थांची भूमिका महत्त्वादी असतेत्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना अधिक उत्पन्न प्राप्त होते परंतु त्यासाठी शासनाने सर्व पातळीवर सहकारी दुग्ध संस्थांना भरीव आर्थिक मदत करण्याची आवश्यकता आहे.

४. **दूध साठविची समस्या :**

गावपातळीवरील बहुतेक प्रारभिक महकारी दूध उत्पादक संस्थांजवळ दूध साठविण्याकरिता पुरेशा सोईसुबिधा असतातशेतकऱ्यांनी जर जास्तीचे दूध विक्रीसाठी आणले तर या संस्था साठवणुकीच्या सोईअभावी त्यांची खरेदी करू शकत नाहीत. बऱ्याच वेळा अशा प्रकारची स्थिती काही प्रमाणात तालुका व जिल्हा संघाच्या बाबतीतही दिसून येते.

५. **दुधाच्या चांगल्या दुधाचा प्रश्न:**

साधारणपणे दूध उत्पादकांना दुधातील स्निग्धतेचे प्रमाण तपासून त्यानुसार त्यांना दुधाची किंमत दिली जावी ही अपेक्षा असते. परंतु, बऱ्याच सहकारी दूध उत्पादक संस्था दुधातील स्निग्धतेचे प्रमाण मोजत नाहीत त्यामुळे काही अप्रामाणिक दूध उत्पादक दुधातील स्निग्धतेचे प्रमाण अधिक दाखविता यावे म्हणून विविध गैरप्रकार करतात हे जर दूध संस्थेच्या लक्षात आले नाही तर दुधाचा दर्जा टिकविण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो.

६. **अनिष्ट स्पर्धा :**

सहकारी दुग्ध संस्थांना अनेक अयोग्य स्पर्धांना तोंड द्यावेलागते खेड्यातील दुग्ध उत्पादन संस्था आपल्या दुग्ध उत्पादकांना त्यांच्या दुधाचे पैसे८ ते १० दिवसांनी देतात. शिवाय कमी फॅटमुळे अनेक दूध उत्पादकांना कमी पैसे मिळतात. याउलट, दूध गोळा करणारे गवळी घरी येऊन दूध घेऊन जातात बहुतेक वेळा रोख पैसे देतात. काही वेळा पैसे आगाऊ देतात. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण भागातील सहकारी दूध व्यवसाय संस्थांना या गवळ्यांच्या अयोग्य स्पर्धेला तोंड द्यावे लागते.

७. **दुभत्या जनावरांचा :**

महाराष्ट्रात अधिक दूध देणाऱ्या दुधाळ जनावरांचा अभाव मोठ्या प्रमाणात आढळतोमहाराष्ट्रातील संकरित गाय एका वेतात २४०० लीटर्स दूध देते तर म्हैशीची एका वेतात दुधक्षमता फक्त८०० लीटर्स इतकीच आहे. बाउलट,

इस्रायलमधील एच. एफ. आय. एका वेतात सरासरीने ९६०० लीटर्स दूध देते. महाराष्ट्रातील दुधाळ जनावरांच्या अभावामुळे सहकारी दूध संस्थांना पुरेसे दूध संकलन करता येत नाही

**८. दुध हाताळणीत नुकसान:**

खेड्यातील दूध उत्पादक प्राथमिक दूध उत्पादक संस्थेला दूध विकतात.तया दूध संस्था तालुका किंवा जिल्हा दूध संघास दुधाची विक्री करतात दुधाची हाताळणी करीत असताना दूध सांडणे,खराब होणे तसेच चोरी होणे या प्रकारामुळे दुधाचे प्रमाण घटत जाते याशिवाय तपासणीसाठी १०० मिली दूध बापरल्यामुळे दुधाचे प्रमाण घटते व शेतकऱ्यांचे नुकसान होते

**९. दुधाच्या उत्पादन खर्चात वाढ :**

खेड्यातील बहुतेक दूध उत्पादक भांडवलाअभावी कमी दूध देणारी जनावरे पाळतात त्यामुळे त्यांचा सरासरी दूध उत्पादनाचानेहमीच जास्त राहतो. त्याचप्रमाणे पशुखाद्य, चारा वैरण यांच्या किमती सतत वाढत असल्यामुळे दुधाच्या उत्पादन खर्चात वाढ होते. परंतु उत्पादन खर्चाच्या वाढीच्या प्रमाणात दुधास किंमत वाढवून मिळत नाही.

**१०. सकस चाऱ्याची समस्या :**

महाराष्ट्रातील अपुरे पाणी व अत्यल्प चराऊ कुरणे या कारणांमुळे दुभत्या जनावरांना सकस चारा मिळत नाही.दुभत्या जनावरांच्या पोषणासाठी हिरवा चारा आणि सकस खाद्य पुरेशा प्रमाणात मिळाले नाही तर त्यांच्या दूध उत्पादनक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो. सामान्य शेतकऱ्यांची ऐपत पशुखाद्य करण्याची नसते. दूध उत्पादकांवर भाकड व अनुत्पादित जनावरांचाही बोजा पडत असतो त्यामुळे दुभत्या जनावरांना पोटभर खाऊ घालणे अशक्य होते त्यामुळे दूध उत्पादन घटते पेंड, भरडा, गव्हाचा व भाताचा भुसा, खनिज मिश्रण इत्यादी सकस आहार दुभत्या जनावरांना पुरेशा प्रमाणात मिळत नाही आणि सहकारी दूध संस्थाही अशा प्रकारची सोय करण्यात यशस्वी झाल्या नाहीत. त्यामुळे सकस चाऱ्याचा प्रश्न शिल्लक आहे.

**११. पुरेशा पशुवैद्यकीय सुविधांचा अभाव :**

महाराष्ट्रातीली काही दूध संघ पशुवैद्यकीय सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध करून देतात, त्यामुळे सभासदांना अधिक पैसा भरून खाजगी सेवा घ्यावी लागते. जास्त दूध देणाऱ्या गाई-म्हैशी यांच्यासाठी जर अनुकूल व असे वातावरण आणि उत्तम प्रकारचे पशुखाद्य मिळाले नाही तर अशी जनावरे रोगांना बळी पडतात. त्यामुळे त्यांची दूध देण्याची क्षमता एकदम कमी होते. त्यामुळे अशा जनावरांसाठी वेळोवेळी वैद्यकीय सल्ला घ्यावा लागतो. परंतु अशा सुविधा सहकारी दूध संस्थेमार्फत उपलब्ध होत नाहीत

**१२. प्रभावी व्यवस्थापनाचा अभाव :**

राज्यातील प्राथमिक व जिल्हा दूध उत्पादकसंघाचे संचालक विनावेतन काम करीत असतात. याशिवाय हे संचालक राजकीय दबावाचा वापर करून व्यवस्थापनात आलेले असतात. असे संचालक एकावेळी अनेक संस्थेत कार्यरत असतात. त्यामुळे त्यांचे संस्थेच्या दैनंदिन कामकाजावर लक्ष नसते.याशिवाय बहुतेक दूध संकलन केंद्रातील कर्मचारी अप्रशिक्षित असतात. त्याचा परिणामहा दूध संस्थेच्या कार्यक्षमतेवर होतो

**१३. चांगल्या पशू प्रजनन तंत्राचा अभाव :**

महाराष्ट्रात अद्यापही दूध देणाऱ्या जनावरांची जोपासना पारंपरिक पद्धतीने केली जात आहे. संकरीकरण व कृत्रिम रेतदानाचे कार्यक्रम पांचा सर्व ठिकाणी पुरेसा प्रसार झालेला नाही. विकसित देशाच्या तुलनेने जनावरांच्या पैदाशीचे तंत्रज्ञान जुने आहे

## निष्कर्ष :

वरील सर्व समस्या विचारात घेतासहकारी दूध व्यवसायाच्या पुढे अनेक आव्हाने आहेत . ते सोडविल्या शिवाय खऱ्या अर्थाने या व्यवसायाची प्रगती होणार नाही .

## संदर्भ :


१ . भारतीय अर्थव्यवस्था : फडके प्रकाशन कोल्हापूर, भोसले ,काटे दामजी .

२. भारतीय अर्थव्यवस्था : हिमालय प्रकाशन, मिश्रा आणि पुरी

३. भारतीय अर्थव्यवस्था : संतोष दास्ताने